**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. २१ व २२.०८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३ | श्री. विवेक वामनराव गुंडगे बुवासाहेब नगर, कोळकी, फलटण, ता. फलटण, जि. सातारा | तहसिलदार, दहिवडी, ता. माण, जि.सातारा | उपविभागीय अधिकारी फलटण, उपविभाग, जि. सातारा | दहिवडी ता. माण, जि. सातारा येथील ग्रा.मि.नं.६५९ मधील हॉटेल त्रिमुर्तीचे असणारे लायसन्स (परवाना) बाबतची माहिती | एकत्रित झालेल्या चर्चेनुसार माहिती बाबत अपील-कर्त्याचे समाधान झालेले असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे |
| २ | ६० | गोपाळ दत्तात्रय केळकर प्लॉट नं १, दुसरा मजला, श्री चेंबर्स, १९८, शनिवार पेठ, सातारा ४१५ ००२ | मुख्याधिकारी सातारा - नगरपरिषद, सातारा | उपायुक्त, (सामान्य प्रशासन ) पुणे विभाग, पुणे १ | आठवड्यातून एक दिवस पाणी पुरवठा बंद करण्यात येत असल्याने वार्षिक पाणी पट्टीतून ४८ दिवसांची रक्कम काढणेबाबतची माहिती | " " |
| ३ | २२८ | श्री. राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर, गोळीबार मैदान. विराम बंगला, फलटण, जि. सातारा | निवासी नायब तहसीलदार, फलटण, जि. सातारा | तहसीलदार, फलटण, जि.सातारा | मौजे राजाळे ता.फलटण जि.सातारा येथील ग.नं.७०१/०१, ७०१/२ या जमिनीच्या प्रस्तावित प्रती मिळणेबाबत | "_" |
| ४ | ३२५ | श्री. नरेंद्र रघुवेंद्र सुमंत १०१७ अ. शनिवार पेठ, सातारा | उप कार्यकारी अभियंता. म.रा. विद्युत वितरण कं. मर्या., कृष्णानगर, सातारा. | कार्यकारी अभियंता, म. रा. विद्युत वितरण कं. मर्या., विभागीय कार्यालय, सातारा | श्री. नायर यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रा बाबत व श्री. सुमंत यांच्या घराच्या तळघराच्या पंचनाम्या बाबतची माहिती | एकत्रित झालेल्या चर्चेनुसार माहिती बाबत अपील-कर्त्याचे समाधान झालेले असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ५७ | श्री. रघुनाथ रामचंद्र यादव, रा. त्रिमुर्ती निवास, विसावा पार्क, सातारा, जि.सातारा | उप कार्यकारी अभियंता, म.रा. विद्युत वितरण कं. मर्या., सातारा विभाग | कार्यकारी अभियंता, म.रा. विद्युत वितरण कं. मर्या., सातारा विभाग | श्री. सुरेश नरहरी जठार यांनी स.नं.१७/२३ मध्ये वीज पुरवठाकामी केलेल्या अर्जाबाबत व इतर ०७ तद्‌अनुषंगिक बाबींबाबत माहिती | एकत्रित झालेल्या चर्चेनुसार माहिती बाबत अपील-कर्त्याचे समाधान झालेले असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे. |
| ६ | ५१ | श्री. गणपत धनवडे, मु.पो.नुने, ता.जि.सातारा | उपविभागीय अधिकारी वाई उप विभाग, वाई जि. सातारा | अप्पर जिल्हाधिकारी सातारा | भुईज ता. वाई येथील स. नं. १२३/१३ बाबत आरटीएस रिव्हीजन अर्ज क्रमांक ४/९८ मध्ये निर्णय का दिला नाही. | सदर रिव्हीजनचा निकाल दि. ३०.३.२००७ रोजी देण्यात आला असल्याने अपीलकर्त्याने अपील काढून टाकणेबाबत सहमती दिली आहे. |

विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये दि.२१ व २२.०८.२००८ रोजी वर नमूद केलेल्या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी परस्परांशी विचारविनिमय करुन अपेक्षित माहितीबाबत निष्कर्ष नमूद करावा असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. त्यानुसार या घटकांमधील चर्चेअंती माहितीबाबत एकमत होऊन अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंचे एकमत झाल्याचे प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे. त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मुदतीनंतर एक आठवड्यात आयोगाला अहवाल सादर करावा.

(३) यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०८-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर रामचंद्र वझे
१२०४/११, 'विवेक', शिवाजीनगर, पुणे-४११००४ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.७.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर रामचंद्र वझे
१२०४/११, 'विवेक', शिवाजीनगर, पुणे-४११००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे
श्री.सुरेश जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे
श्री.जनार्दन खाकोटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.८.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि.२८.७.२००६ रोजी श्री.थोरात यांच्यासमोर झालेल्या सुनावणीचे मिनिटस्-नक्कल, दि.७.५.२००७ रोजी लोकशाही दिनाचे वेळी दिलेल्या आदेशानुसार श्री.लंकेसाहेब यांनी केलेल्या साईट व्हीजिटबद्दलचा रिपोर्ट, तसेच श्री.रणदिवेसाहेब यांनीही व्हिजिट केली त्या साईट रिपोर्टची नक्कल, श्री.रणदिवे, सहा.अभियंता यंनी माझ्या दि.९.१०.२००६ रोजीच्या

| | |
|---|---|
| | (Fraudulent Plinth Chcking) या पत्रासंबंधी, शहर अभियंता यांना दिलेल्या निवेदनाची नक्कल, श्री.गोडसे स्ट्रक्चरल इंजिनिअर यांनी स्वतःचेच दिलेले स्टॅबिलिटी सर्टिफिकेट रिवोक केले होते ते पुन्हा ग्राह्य धरण्यास हरकत नाही या आशयाच्या पत्राची नक्कल |

## विवेचन

आपण १२०४/११ शिवाजीनगर येथील बांधकामाच्या संदर्भात दि.७.५.२००७ रोजी लोकशाही दिनी आयुक्त, महानगरपालिका,पुणे यांच्याकडे केलेल्या अर्जावर त्यानी दिलेल्या आदेशानुसार सहाय्यक अभियंता श्री.लंके यांनी प्रत्यक्ष जागेला भेट देऊन सादर केलेल्या अहवालाची प्रत आपल्याला मिळावी, यासह अनुषंगिक माहिती अपीलकर्ता श्री.प्रभाकर रामचंद्र वझे यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी विहित मुदतीत उत्तर दिले, परंतु 'सहाय्यक अभियंता (बांधकाम नियंत्रण) यांनी जागा पाहणीचे स्वतंत्र अहवाल सादर केलेले नाहीत. तसेच आपले दि.९.१०.२००६ च्या Fraudulent Plinth Checking च्या पत्रासंदर्भात व इतर मुद्दयांबाबत सविस्तर निवेदन नगर अभियंता यांच्याकडे सादर केलेले असून त्यावर अद्याप कोणतेही अंतिम आदेश आले नसल्यामुळे तूर्त सदर निवेदनाची प्रत देता येणार नाही,' असे कळविले. त्याविरुध्द श्री.वझे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. श्री.वझे यांनी मागणी केल्याप्रमाणे उपलब्ध असणारी सर्व माहिती त्यांना देण्यात यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. तरीही श्री.लंके यांचा अहवाल न मिळाल्यामुळे श्री.वझे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. या अपिलाचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त समावेश करण्यात आला होता. उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत न झाल्यामुळे त्याची सुनावणी घेण्यात आली.

संबंधित बांधकाम बेकायदेशीर असून श्री.लंके यांचे वास्तव आणि खरे अभिप्राय मिळाले असते तर विकास अभियंता श्री.शांताराम खंडेलाल थोरात व नगर अभियंता श्री.प्रशांत

बाघमारे यांना निर्णय करता आला नसता, असे श्री.वझे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. मात्र श्री.लंके यांनी स्वतंत्र अहवाल सादर केला नाही. त्यामुळे तो उपलब्ध नसल्याने देण्यात आला नाही व तसे श्री.वझे यांना विहित मुदतीत कळविण्यात आले आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जनार्दन खाकोटे यांनी सांगितले. संबंधित बांधकामाचा आराखडा मंजूर केल्यानंतर कायदा विभागाला विचारणा करण्यात आली होती व त्यांनी मान्यता दिली होती. हे प्रकरण न्यायालयात गेल्यावर 'तांत्रिक बाबीवर महानगरपालिकेने निकाल द्यावा,' असा आदेश न्यायालयाने दिला. त्यानुसार श्री.लंके यांनी जागा पहाणी करुन अहवाल देण्याचा आदेश आयोगाने दिला होता, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, वि.का. क्र.१, पुणे महानगरपालिका श्री.सुरेश जगताप यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.लंके यांचा जागा पहाणी अहवाल दडवून ठेवून बांधकामाबाबतचे प्रस्ताव करण्यात आले आहेत, ते रद्द करावेत, बेकायदा बांधकाम बांधून टाकण्याच्या संदर्भात आदेश द्यावा, आदी मागण्या श्री.वझे यांनी लेखी व तोंडी केल्या. परंतु हे विषय प्रशासकीय कार्यवाहीचे असून राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाहीत. मात्र संबंधित माहिती पारदर्शकतेने नागरिकाला मिळाली पाहिजे, या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तत्त्वानुसार ती मिळणे हा श्री.वझे यांचा हक्क आहे. महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशानुसार श्री.लंके यांनी अहवाल / अभिप्राय दिला की नाही? तसा तो दिला नसल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम खंडेलाल थोरात यांनी म्हटले आहे व विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनीही विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत निवेदनात तसे नमूद केले आहे. असा अहवाल महानगरपालिकेने दिला नसल्यास महानगरपालिका आयुक्तांनी त्या संदर्भात काय कार्यवाही केली? असे अहवाल नसतानाही विकास अभियंता यांनी कायम केलेला सीसी३६१०/०५, दि.१७.१.२००६ हा निर्णय कशाच्या आधारे घेतला? संबंधित बांधकामाबाबत तीनही वाटेकऱ्यांच्या सह्यांसह (मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार) कागदपत्रे सादर झाली नसल्यास तत्कालीन विकास अभियंता व नगर अभियंता यांनी घेतलेल्या निर्णयास विधी

खात्याची मान्यता आहे काय? असे प्रश्न यातून निर्माण होतात. या सर्व प्रश्नांबाबतची माहिती श्री.वझे यांना दिली गेली पाहिजे. तसेच श्री.लंके यांनी अहवाल सादर केला की नाही, याबाबत श्री.लंके यांचे लेखी स्पष्टीकरण मागविले जाणे आवश्यक आहे. कारण महानगरपालिका आयुक्तांनी आदेश दिल्यानंतर श्री.लंके यांनी जागा पहाणी केली आहे. परंतु त्यांनी कोणता अभिप्राय दिला, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केलेले नाही. त्यांनी अहवाल सादर केला नाही, एवढेच स्पष्टीकरण संबंधित विषयातील शंका दूर करण्यास पुरेसे नाही. विषय एका कुटुंबाशी संबंधित असा असला, तरी त्यात गुंतलेले कारभारातील पारदर्शकतेचे तत्त्व व्यापक महत्त्वाचे आहे. या बाबींचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांच्या आदेशानुसार सहाय्यक अभियंता श्री.लंके यांनी अहवाल सादर करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा लेखी खुलासा श्री.लंके यांच्याकडून घेऊन दि.२५.८.२००८ पर्यंत आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांनी आयोगाला सादर करावा.

(३) संबंधित मिळकतीत कोणतेही बांधकाम करण्याबाबत तीनही वाटेकऱ्यांच्या सह्या ( श्री.वझे बंधूंच्या ) असणे आवश्यक असल्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिला होता. अशा सह्या आहेत का व त्या नसल्यास कशाच्या आधारे निर्णय नगर अभियंता व विकास अभियंता यांनी घेतला, याची माहिती अपीलकर्त्याला जन माहिती अधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात द्यावी व त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.११.८.२००८
ऑगस्ट-०८-७७-८०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सदानंद जगन्नाथ शेरे<br>मु.पो.जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कामगार तलाठी जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी नायब तहसीलदार पुरंदर, जि. पुणे | हजर |

श्री. सदानंद जगन्नाथ शेरे यांनी तलाठी कार्यालय, जेजुरी येथे ८-अ, सातबारा, फेरफार, कर्जबोजा चढविणेबाबत घेतलेल्या पावतीच्या अनुषंगाने दोन मुद्दयांची माहिती मागितली होती.

इकरार वर एकच गटावर कर्ज लिहावे, तहसीलदार यांनी स्पष्ट सही करावी व नंतर अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने वरील तीनही घटकांमधील चर्चेअंती सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** *११.०८.२००८*

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. ज्ञानदेव झुंबर जगताप<br>डेअरी विभाग, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे<br>महानगरपालिका, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अतिरिक्त आयुक्त (विशेष),<br>पुणे महानगरपालिका, पुणे | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ता श्री. ज्ञानदेव झुंबर जगताप यांनी शिक्षण सेवकांच्या नियमित वेतनश्रेणीच्या आदेशाबाबतची माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यास उत्तर देण्यात आले. परंतु अपीलकर्त्याची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्यांना — विहित दिनांकापासून वेतनश्रेणी लागू केलेली आहे व विहित कार्यपध्दतीनुसार कार्यपूर्ण करण्यास सहा महिन्यांचा कालावधी लागलेला आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे.

अपीलकर्त्याची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र तीही मागणी पूर्ण झालेली आहे, हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** १३.८.२००८

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. संतोष ज्ञानेश्वर चिपडे<br>मु.पो.धसपिंपळगाव, ता. बार्शी, जि.सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत<br>महावितरण कंपनी, बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत<br>महावितरण कंपनी, बार्शी, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. संतोष ज्ञानेश्वर चिपडे यांनी बार्शी कुर्डूवाडी येथील ३३ के.व्ही. वाहिनीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महावितरण बार्शी, यांच्याकडे मागितली होती.

विशेष अपील निर्गत कार्यक्रमात वरील तीनही घटकांमधील चर्चेत सदर माहिती बाबत एकमत न झाल्याने समक्ष सुनावणी घेण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून दिलेल्या आदेशानुसार अपीलकर्त्यास दि. १.७.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे दि. ३.७.२००८ च्या पत्राने अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, बार्शी यांनी आयोगास कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ३० .८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.२८.०८.२००८ रोजी पुणे येथे आयोजित केलेल्या सुनावणीमध्ये खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५६९/ पुणे | श्री.छगन दामाजी काचा, ५८७, बुधवार पेठ, पुणे | नगर उप अभियंता, विकास योजना पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अनिरूध्द घनश्याम पावसकर | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगर-पालिका, पुणे श्री. मदन रामचंद्र आढारी | मौजे महर्षि कर्वेनगर येथील सर्व्हे नं.८ चा भाग नकाशा मिळणे बाबत | अपीलकर्त्याने दि. २६.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहितीची आवश्यकता नसल्याचे आयोगास कळविले. |
| २ | १५७०/ पुणे | --"-- | --"-- | --"-- | --"-- | --"-- |
| ३ | १७४२/ पुणे | श्री.श्याम मंडावळे, ५८७, बुधवार पेठ, पुणे | --"-- | --"-- | मौजे लोहगाव, ता. हवेली येथील सर्व्हे नं.२४७ चा भाग नकाशा | प्राप्त माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगास दि. २५.८ .२००८ रोजी कळविले |
| ४ | १८५८/ पुणे | श्रीमती अनुराधा उकिरडे, ५८७, बुधवार पेठ, पुणे | --"-- श्री. प्रविण वामन गेडाम | --"-- | मौजे बाणेर, ता. हवेली येथील सर्व्हे नं.३१/१ चा झोन दाखला | प्राप्त माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगास दि. २४.८. २००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले. |
| ५ | १८६०/ पुणे | --"-- | --"-- | --"-- | --"-- | --" |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १७२७/ पुणे | श्री.व्ही.जी. राव ५८७, बुधवार पेठ, पुणे | --" -- श्री. प्रविण वामन गेडाम | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगर-पालिका, पुणे श्री. मदन रामचंद्र आढारी | मौजे वडगाव-शेरी, ता.हवेली येथील सर्व्हे नं.५० चा भाग नकाशा | माहिती मिळा[illegible] अपीलकर्त्याने २४.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले. |
| ७ | १७३९/ पुणे | श्री.व्ही.जी. राव ५८७, बुधवार पेठ, पुणे | --" -- श्री. प्रविण वामन गेडाम | --"-- | --"-- | --"-- |
| ८ | १६६९/ पुणे | श्री. विलास जगन्नाथ टकले ५८७, बुधवार पेठ, पुणे | --" -- श्री. प्रविण वामन गेडाम | --"-- | मौजे धानोरी, ता. हवेली येथील सर्व्हे नं.२६ चा भाग नकाशा | भाग नकाशाची आवश्यकता नसल्याचे अपीलकर्त्याने दि. २६.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले. |
| ९ | १६७०/ पुणे | --"-- | --" -- | --"-- | --"-- | --"-- |
| १० | १९१३/ पुणे | श्रीमती निता सुभाष पटवर्धन ५८७, बुधवार पेठ, पुणे | --" -- श्री. प्रविण वामन गेडाम | --"-- | मौजे कोंढवा बु., ता. हवेली येथील सर्व्हे नं. ४६ चा झोन दाखला | मागणीप्रमाणे कागदपत्रे मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने दि. २६.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले. |
| ११ | १९०८/ पुणे | --"-- | --"-- | --"-- | --"-- | --"-- |
| १२ | १५६८/ पुणे | श्री. अर्जुन नामदेव ठोंबरे ५८७, बुधवार पेठ, पुणे | --" -- श्री. प्रविण वामन गेडाम | --"-- | मौजे कोथरूड येथील सर्व्हे नं. ७९ चा झोन दाखला | माहितीची आवश्यकता राहिली नस[illegible]चे अपीलकर्त्याने आयोगास दि.२६.८. २००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले. |
| १३ | १५७१/ पुणे | श्रीमती विमल धोंडिराम ढवळे, ५८७, बुधवार पेठ,पुणे | --" -- श्री. प्रविण वामन गेडाम | --"-- | मौजे बाणेर ता. हवेली येथील सर्व्हे नं. २३२ चा झोन दाखला | माहितीची आवश्यकता राहिलीनसल्याचे अपीलकर्त्याने आयोगास दि.२८.८. ०८ रोजीच्या पत्रान्वये कळविले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५७२/ पुणे | --"-- | --"-- | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगर-पालिका, पुणे श्री. मदन रामचंद्र आढारी | --"-- | --"-- |
| १५ | १७४३/ पुणे | श्री. मुंकुद जगन्नाथ कुलकर्णी ५८७, बुधवार पेठ, पुणे | --"-- श्री. प्रविण वामन गेडाम | --"-- | मौजे लोहगाव ता. हवेली येथील सर्व्हे नं. २४७ चा भाग नकाशा | --"-- |
| १६ | १७७६/ पुणे | --"-- | --"-- | --"-- | --"-- | --"-- |

वर नमूद अपिल अ.क्र. १५६९, १५७०,१७४२, १८५८, १८६०, १७२७, १७३९, १६६९, १६७०, १९१३, १९०८,१५६८, १५७१, १५७२, १७४३, १७७६ मध्ये दि. २८.८.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

वरील सर्व अपिलांमधील अपीलकर्त्यांचे अक्षर सारखेच असून पत्ता एकच आहे. या सर्व अपिलांमधील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी समक्ष हजर होते. मात्र सर्व अपीलकर्ते गैरहजर होते. सर्व अपीलकर्त्यांनी लेखी निवेदने आयोगाला सादर केली असून 'निष्कर्ष' या सदरी नमूद केल्यानुसार माहिती प्राप्त झाल्याने तक्रार नसल्याचे किंवा माहितीची आवश्यकता राहिली नसल्याचे नमूद केले आहे. या सर्वांनी प्रामुख्याने भाग नकाशा व झोन दाखला यांची मागणी केली असून महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार असे नकाशे, दाखले यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. अशा नकलांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये करण्यापेक्षा अपीलकर्त्यांनी प्रचलित नियमानुसार तसे अर्ज करणे अधिक उचित ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व बारा अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.** ३० **.८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.३.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अशोक जयसिंगराव शिंदे<br>येरवडा प्रेस कॉलनी, ब्लॉक नं.७-ड,<br>येरवडा, पुणे-४११ ००६ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, येरवडा कारागृह मुद्रणालय,<br>पुणे-४११ ००६ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्र. व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय,<br>पुणे-४११ ००६ | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. अशोक जयसिंगराव शिंदे यांनी दि. १३.१.२००६ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे यांनी दिलेली माहिती चुकीची असल्याच्या कारणावरुन स्पष्टीकरण मागणारा दुसरा अर्ज दि. २०.२.२००६ रोजी केला. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर श्री. अ.या.दुधगावकर यांची अपिलीय प्राधिकारी म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्याकडून नैसर्गिक न्याय मिळणार नाही, म्हणून तसेच स्वत: विरुध्द झालेले अपील चालविण्यास ते नकार देत आहेत, असे श्री. शिंदे यांनी अपिलासोबतच्या निवेदनात नमूद केले आहे.

श्री. शिंदे यांनी येरवडा कारागृह मुद्रणालयातील मागासवर्गीय पदांच्या भरतीबाबतची माहिती मागितली होती. रिक्त पदे व भरलेली पदे यांचे आकडे जुळत नसल्यामुळे त्याबाबतची विचारणा करणारा दुसरा अर्ज आपण दिला, असे श्री. शिंदे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री. शिंदे यांनी मागितलेली सर्व माहिती विहित मुदतीत दिली, काही माहिती द्यावयाची राहिली होती. मागितलेली माहिती आस्थापना शाखेची असल्याने त्यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांना दिली. दोन पदांची माहिती द्यावयाची राहिली होती, ती नंतर दिली. माहिती नाकारण्याचा त्यामध्ये उद्देश नव्हता, असे जन माहिती अधिकारी, येरवडा कारागृह मुद्रणालय श्री. दुधगावकर यांनी संबंधित कागदपत्रांसह स्पष्ट केले.

दि. २०.२.२००६ च्या अर्जातील एकाही मुद्दयाची माहिती दिली गेली नाही, असे प्रतिपादन श्री. शिंदे यांनी केले. परंतु ऊर्वरित १३ पदे कशी भरण्यात आली याची माहिती दिली आहे. 'मला चुकीची व अर्धवट माहिती दिली आहे का,' असा प्रश्न त्यात विचारला आहे. भरती करताना किती वर्तमानपत्रात जाहिरात देण्याचा नियम आहे, अशी श्री. शिंदे यांनी विचारणा केली आहे. परंतु याबाबत शासकीय नियम नसल्यामुळे तशी माहिती दिली नाही, मात्र किती वर्तमानपत्रात जाहिरात दिली, ते कळविले, असे श्री. दुधगावकर यांनी नमूद केले. आपल्याच आदेशाविरुध्द केलेल्या अपिलाची सुनावणी आपणच घेणे नैसर्गिक न्याय तत्वाप्रमाणे योग्य नसल्याचे मत असल्यामुळे आपण तसे पत्र अन्य अर्जदाराला दिले, असे श्री. दुधगावकर यांनी सांगितले.

श्री. दुधगावकर यांनी श्री. शिंदे यांना सर्व माहिती दिली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबतची त्यांची भूमिका योग्य आहे. मात्र 'आधीचे अपिलीय प्राधिकारी कार्यरत असताना श्री. शिंदे यांनी अपील केले नाही. माहितीबाबत ते समाधानी असल्यामुळे त्यांनी अपील केलेले नाही,' हे श्री. दुधगावकर यांनी दि. ८.१२.२००७ च्या निवेदनात केलेले विधान दि. १३.१.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात योग्य आहे, दि. २०.२.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .८.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१२.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. वासदेव कोंडूमल इदनानी<br>२७/३, पी.डब्ल्यू.डी. क्वार्टस्, पिंपरी कॉलनी, पुणे-४११ ०१७ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक संचालक, शिक्षण विभाग, पुणे विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप संचालक, शिक्षण विभाग, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. वासदेव कोंडूमल इदनानी यांनी जयहिंद कॉलेज, पिंपरी, पुणे येथील वाणिज्य व सायन्स शाखेतील विद्यार्थी संख्या व तुकड्या संबंधात माहिती मागितली होती.

वरील तीन घटकांमधील चर्चेत एकमत होऊन अपीलकर्त्यास दि. २५.६.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मान्य केले, असे तीनही घटकांनी लेखी निवेदनात नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्यास माहिती देण्याच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास त्वरित सादर करावा.

**पुणे**
**दि.** १२.८.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी<br>मु.पो. कुर्डूवाडी, श्रीदत्त रोड, ता. माढा,<br>जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक विक्रीकर आयुक्त, बार्शी,<br>ता. बार्शी जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विक्रीकर सह आयुक्त,<br>सोलापूर विभाग, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी यांनी मुंबई विक्रीकर कायद्याखालील देशी मद्य विक्री परवाना नुतनीकरणासाठी आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र व्यापाऱ्याचे विवरणपत्रकाच्या व निर्धारस्तव आदेशांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त, बार्शी यांच्याकडे मागितल्या होत्या.

माहिती शुल्क भरून मुदतीत घेऊन जाण्यास कळवूनही श्री. भलाणी माहिती घेण्यास आले नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले. उपलब्ध कागदपत्रे पाहता श्री. भलाणी यांनी संपर्क साधल्याचे दिसून येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .८.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**